**माजी केंद्रीय मंत्री तथा माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावरील अभिनंदनपर ठराव  कित्येक पिढ्यांना मार्गदर्शन मिळत राहील, एवढे शरद पवारांचे कार्य व्यापक-        एकनाथराव खडसे**

मंत्री (महसूल, कृषी व पदुम) यांचे

शिबीर कार्यालय, नागपुर

प्रसिध्दी पत्रक

नागपुर, दि.21डिसेंबर 2015

माजी केंद्रीय मंत्री तथा माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावरील अभिनंदनपर ठराव  कित्येक पिढ्यांना मार्गदर्शन मिळत राहील, एवढे शरद पवारांचे कार्य व्यापक-        एकनाथराव खडसे

नागपुर, 21 डिसेंबर : प्रागतिक विचार, दूरदृष्टीने धोरण आखण्याचे व निर्णय घेण्याचे कौशल्य, त्याचप्रमाणे कठोर टीका झाली तरी हसतमुख राहून सर्व पक्षातील कार्यकर्त्यांशी आणि नेत्यांशी आपुलकीचे संबंध जपणाऱ्या शरद पवार यांच्या सारख्या ज्येष्ठ नेत्याच्या मार्गदशर्नाची महाराष्ट्राला आणि देशाला गरज आहे आणि ते मिळत राहील, अशा शब्दात कृषी व महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज माजी केंद्रीय मंत्री तथा माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्या पंच्याहत्तरी निमित्त विधानपरिषदेत मांडलेल्या अभिनंदनपर ठरावावर बोलतांना आपल्या भावना व्यक्त केल्या.

देशातील काही मोजक्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये सर्वात तरुण मुख्यमंत्री अशी ख्याती प्राप्त केलेले नेते म्हणून शरद पवारांचे नाव घेतले जाते, असे सांगून खडसे पुढे म्हणाले की, पवार यांच्या प्रत्येक निर्णयातून शेतकऱ्यांबद्दलची कळकळ व्यक्त झाली आहे. शेतकऱ्यांचे ७० हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय असो, अथवा शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा मिळावा म्हणून राज्यात वायनरीज् स्थापना करण्याचा निर्णय असो. प्रत्येक वेळी त्यांच्यावर कठोर टीका झाली. परंतु, पवार शांत राहीले आणि या निर्णयामागील भूमिका त्यांनी अतिशय समर्पक शब्दा मांडली. आज महाराष्ट्रातील शेतकरी आपली फळफळावळ परदेशात निर्यात करतो आहे, त्या पाठीमागे शरद पवार यांची रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन योजना हीच कारणीभूत आहे. त्यांच्या दूरदृष्टीचेच हे प्रतीक आहे.

शरद पवार हे आगळं वेगळं व्यक्तिमत्व असून अनेक गुण त्यांच्या व्यक्तिमत्वात सामावले आहे. बावीसाव्या वर्षी राजकीय जीवनाची कारकींद सुरु केल्यानंतर आजपर्यंत जीवनात त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले. अनेकवेळा कठोर टीकाही त्यांच्यावर झाली. परंतु, राजकारणा पलिकडे जाऊन त्यांनी निर्णय घेतले. आजपर्यंत त्यांनी मागे वळून पाहिले नाही. विचारांची लढाई विचारानेच लढली पाहिजे, हे तत्व अनुसरुनही त्यांनी राजकारणा पलिकडे जाऊन व्यक्तिगत संबंध जपले, असेही खडसे यांनी यावेळी सांगितले.

आज महाराष्ट्राच्या राजकारणासह अनेक क्षेत्रात मोठ्या संख्येने महिला पुढे आल्या आहेत, त्याचे सारे श्रेय शरद पवार यांनी महिलांना दिलेल्या तेहतीस टक्के आरक्षणाच्या निर्णयाकडे जाते, असे सांगून खडसे म्हणाले की, शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत, त्याचे आर्थिक मागासलेपण दूर झाले पाहिजे, यासाठी पवारांनी सातत्याने प्रयत्न केले. सत्तर हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा धाडसी निर्णय शरद पवारांच्या पूर्वी कोणी घेतलेला नव्हता, ते धाडस त्यांनी दाखविले. दंगली असोत अथवा भूकंपासारखी नैसर्गिक आपत्ती असो या दोन्ही प्रसंगात शरद पवारांनी अत्यंत कौशल्याने परिस्थिती हाताळली. भूकंपाच्या वेळी  त्यांनी तात्काळ निर्णय घेतल्यामुळे अनेकांचे संसार उभे राहिले, अनेकांचे मनोबल उभे राहिले.

बेरोजगार तरुणांना आपण शासकीय नोकऱ्यांमध्ये सामावून घेऊ शकत नाही यासाठी त्यांनी फुल शेती, शेड नेट, पॉली नेट तसेच दुग्धव्यवसाय इत्यादींना चालना दिली. शेती तोट्यातून नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न केले, असे सांगून खडसे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांना फोन करतात, यावरुन पवारांचे मोठेपण आणि अनुभव किती व्यापक आहे, हे समजून येते.

शरद पवार यांचे पंतप्रधान पदासाठी नाव घेतले जाते. पंतप्रधान पदासाठी शरद पवार हे सक्षम नेतृत्व आहे, असे सांगून खडसे म्हणाले की, त्यांची आजपर्यंतची वाटचाल अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल एवढी मोठी आहे, अशा या अतिशय लोकप्रिय नेत्याला मी दीर्घायुष्य चिंतीतो आणि त्यांनी शतायुषी व्हावे, अशी सद्भावना व्यक्त करतो, या शब्दात खडसे यांनी शरद पवार यांच्या अभिनंदनपर ठरावाचा समारोप केला.

**-**